# जनसंपर्क अधिकारी

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २२५-२३** **दिनांक :- १४/०७/२०२३**

**दुचाकी वाहन चोरी करुन जबरी चोरी व घरफोडी करणाऱ्या आरोपीतांना अटक.**
**पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.**

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ०८/०६/२०२३ रोजी रात्री ०९.०० वाजता ते दिनांक ०९/०६/२०२३ रोजी सकाळी ०७.०० वाजताच्या दरम्यान उमर कम्पाऊंड, सोपाराफाटा, नालासोपारा पुर्व, ता.वसई, जि.पालघर येथे फिर्यादी यांचे श्रीराज वडापाव सेंटर या कॅन्टीगचे उघडया दरवाजा वाटे तसेच फिर्यादीचे शेजारी असलले साक्षीदार अशोक चौरसिया यांचे पान टपरी मधुन अज्ञात चोरटयाने उघडया दरवाज्या वाटे आत प्रवेश करुन गॅसबाटला, भांडी व पानटपरीचे साहीत्य असा माल चोरी करुन चोरल्याबाबत फिर्यादी नामे श्री. लक्ष्मण लाडक्या बामणे, राकेश लालचंद शर्मा, वय-४० वर्षे, यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात आरोपीताविरुध्द पेल्हार पोलीस ठाणेत गुन्हा रजि.नं. I ५५३/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३८० अन्वये करण्यात आला.

तसेच पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दि.१०/०७/२०२३ रोजी सकाळी ०८.०० वा. च्या सुमारास संय्यद बिल्डींग, स्कुल कंम्पाऊड, गोविंद चाळ, नवजिवन, शांतीनगर, नालासोपारा पूर्व, ता-वसई, जि-पालघर येथे फिर्यादी यांचे राहते घराचे उघडया दरवाज्या वाटे घरात प्रवेश करुन अज्ञात चोरटयाने मोबाईल फोन चोरी करुन चोरल्याबाबत फिर्यादी नामे राजु लालचंद जैस्वाल यांनी दिलेल्या तक्रारीवरुन अज्ञात आरोपीताविरुध्द पेल्हार पोलीस ठाणेत गु.रजि.नं. I ६२९/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३८० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

वर नमुद गुन्हयाचे अनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचे घटनास्थळावरील सी.सी.टी.व्ही. फुटेज व गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपी नामे १) आलोक जिलाजित गिरी, रा. बिलालपाडा, २) विनायक जनता गुप्ता, रा. भाईंदर पुर्व, ता.जि.ठाणे, ३) सुधाकर राकेश सिंग, रा.,बिलालपाडा **तसेच** ४) रहिम अलीम शहा, रा. शांतीनगर, नवजीवन, ५) शफीअहमद अब्दुल रज्जाक शहा, रा. शांतीनगर, नवजीवन, ६) निरज ध्रुप शर्मा ऊर्फ खेकडा, रा. नवजीवन, वसई पुर्व, ७) रामअचल काशिराम प्रजापती, रा. नवजीवन, वसई पुर्व, ता.वसई, जि.पालघर यांना ताब्यात घेवुन तपास केला असता त्यांनी वर नमुद गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना वर नमुद गुन्हा तसेच यातील आरोपीत क्र. १ ते २ यांना दिनांक ०६/०७/२०२३ रोजी, अ.नं. ३ यांस दिनांक ०९/०७/२०२३ रोजी, आरोपीत क्र. ४ ते ७ यांना १०/०७/२०२३ रोजी अटक करुन, त्यांनी चोरी केलेले ३ गॅस बाटला, ८ मोबाईल फोन, रोख रक्कम, भांडी, पानटपरी सामान असा एकुण १,१०,५००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. नमुद आरोपीत यांचेकडून खालील प्रमाणे गुन्हे उघडकीस आले आहेत.

## -:उघडकीस आलेले गुन्हे:-

| अ.नं. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नंबर, |
|---|---|---|
| १ | पेल्हार पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नं. ५५३/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ३८०,३४ प्रमाणे, |
| २ | पेल्हार पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नं. ६३६/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ३९२,३४ प्रमाणे, |
| ३ | पेल्हार पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नं. २४४/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ४५७,३८०,३४ प्रमाणे, |
| ४ | पेल्हार पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नं. ६२२/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ४२०,३४ प्रमाणे |
| ५ | पेल्हार पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नं. ६२३/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ३८०,३४ प्रमाणे, |
| ६ | पेल्हार पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नं. ५९६/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ३७९,३४ प्रमाणे, |
| ७ | पेल्हार पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नं. ४८४/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ३७९,३४ प्रमाणे, |
| ८ | पेल्हार पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नं. ६१९/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ३८०,३४ प्रमाणे, |
| ९ | वालीव पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नं. ५८९/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ३९२,३४ प्रमाणे, |
| १० | वसई रेल्वे पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नं. ६८९/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ३७९,३४ प्रमाणे, |
| ११ | पेल्हार पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नं. ६२९/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३८०,३४ प्रमाणे |
| १२ | पेल्हार पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नं. ६३१/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३८०,३४ प्रमाणे |
| १३ | पेल्हार पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नं. ६३२/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३९२,३४ प्रमाणे |
| १४ | पेल्हार पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नं. ६३३/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३७९,३४ प्रमाणे |

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली पेल्हार पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. वसंत लब्दे, पो.नि. श्री. महेंद्र शेलार (गुन्हे) तसेच गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पो.उप.नि. सनिल पाटील, पो.हवा. योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, पो.अंम रवि वानखेडे, संजय मासाळ, किरण आव्हाड, निखिल मंडलिक, दिलदार शेख, अनिल साबळे, सुजय पाटील तसेच पो.हवा. नामदेव ढोणे, पो.अंम. सोहेल शेख पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३ कार्यालय यांनी केली आहे.

**-----0000------**